# आयसीएआय परीक्षेतील गुणवंतांचे कौतुक

## राष्ट्रीय अध्यक्ष अमित आपटे यांच्या हस्ते झाला गुणवंतांचा गौरव

प्रतिनिधी ।औरंगाबाद

दि इन्स्टिटयूट ऑफ कॉस्ट अकाउंटंट्स ऑफ इंडिया (कोलकाता) यांच्या वतीने डिसेंबर २०१७ आणि जून २०१८ मध्ये घेण्यात आलेल्या फाउंडेशन, इंटरमीजिएट आणि फायनल परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा द इन्स्टिटयुशन ऑफ इंजिनिअर्सच्या हॉलमध्ये सोमवारी सायंकाळी उत्साहात झाला.

इन्स्टिटयूट ऑफ कॉस्ट अकाउंटंट्स ऑफ इंडिया-कोलकाताचे राष्ट्रीय अध्यक्ष सीएमए अमित आपटे, संयुक्त- आयुक्त, वस्तू आणि सेवा कर अशोक कुमार, सीएमए सुचित नायडू - मुख्य वित्तीय अधिकारी (सीएफओ)- हिंदाल्को-अल्मेक्स अरोस्पेस लिमिटेड,अध्यक्ष, डब्ल्यूआईआरसी. इन्स्टिटयूट ऑफ कॉस्ट अकाउंटंट्स ऑफ इंडिया,अध्यक्ष मुंबई,सीएमए एल.डी. पवार, सीएमए हर्षद देशपांडे, खजिनदार -डब्ल्यूआयआरसी इन्स्टिटयूट ऑफ कॉस्ट अकाउंटंट्स ऑफ इंडिया, मुंबई, सीएमए नीरज जोशी, प्रादेशिक परिषद सदस्य यांची प्रमुख उपस्थिती होती. चॅप्टरच्या उपक्रमांची माहिती चॅप्टरचे अध्यक्ष सीएमए एम. आर. पंडित यांनी, तर प्रशिक्षण समितीच्या उपक्रमांची माहिती प्रशिक्षण समितीचे अध्यक्ष सीएमए पराग राणे यांनी दिली. या प्रसंगी आपटे म्हणाले, विद्यार्थ्यांनी एकाग्रचित्ताने ध्येयाचा पाठपुरावा केल्यास वैयत्तिक आणि व्यावसायिक उन्नतीचा मार्ग सुकर होऊन जीवनात यशस्वी होता येईल. सायली सौंदत्तीकर यांच्या गणेश वंदनेने कार्यक्रमास प्रारंभ झाला. प्रमुख पाहुण्यांचे स्वागत औरंगाबाद चॅप्टरचे अध्यक्ष सीएमए एम. आर. पंडित, सचिव सीएमए किरण कुलकर्णी, प्रशिक्षण समितीचे अध्यक्ष सीएमए पराग राणे, खजिनदार सीएमए प्रकाश ससेमहाल, कार्यकारिणी सदस्य सीएमए सुरेश पिंपळे आणि सीएमए सुरेश भंगाळे यांनी केले. परिचय सचिव सीएमए किरण कुलकर्णी आणि सीएमए अक्षय दंडे यांनी केले.सूत्रसंचालन मधुरा दीक्षित यांनी केले, तर सीएमए किरण कुलकर्णी यांनी आभार मानले. याप्रसंगी संस्थेचे औरंगाबाद शाखेचे सीएमए बिशेश्वर सेन, सीएमए राजेश देशमुख, सीएमए शैलेंद्रसिंग राजपूत यांच्यासह बहुसंख्य सभासद आणि अनिल कुलकर्णी, सीएस सागर देब, सीएमए संवेदी राणे, सीएमए अनंत दरगड हे शिक्षकवृंद, कॉलेजचे प्रा. राजेश लहाने, प्रा. रूपेश रेख्वा यांची विशेष उपस्थिती होती.

## हे विद्यार्थी झाले सीएमए फायनल कोर्समध्ये उत्तीर्ण

कोमल पारस मुथा, दीपक नामदेव नाईक, चैतन्य विजय कंवर, गणेश शेषराव ताठे, अमूल्य कार्तिका विश्वांद्धा, विशाल कृष्णकांत नाईक, खालेद अन्सारी, अजिंक्य सुरेश महाजन, अमोल धोंडीराम लहाने, नितीन नरेश कपूर, राहुल प्रमोद गरड, रंजीत नंदुरे, समृद्धी गिरिजाशंकर स्वरो, संतोष पंढरीनाथ थावडे, श्रेयस चंद्रशेखर खोंडे, धनंजय शिवप्रसाद भांबुरले, सागर संजयकुमार बाहेती.

# बदलत्या अर्थव्यवस्थेत लाखांवर तज्ज्ञांची गरज

**भारताची अर्थव्यवस्था वेगाने बदलत आहे. जीएसटी, कंपनी कायदा-२०१३, 'इनसॉल्वेंसी अँड बँकरप्सी कोड २०१६' या कायद्यांनमुळे 'कॉस्ट अँड मॅनेजमेंट अकाउंटंट्स' क्षेत्रात सध्या दीड लाख तज्ज्ञांची गरज आहे. प्रत्यक्षात 'सीएमए', 'सीए', 'सीएस' पदवी घेणाऱ्यांची दरवर्षीची संख्या जेमतेम तीस हजार आहे. यासह वैद्यकीय सेवांचा आकार, शेतमालाचा हमीभाव निर्धारित करण्याबद्दलचा अहवाल 'इन्स्टिट्यूट ऑफ कॉस्ट अकाउंटंट्स ऑफ इंडिया' सरकारला देणार आहे. ७५व्या वर्षांत पदार्पण करणाऱ्या या संस्थेचे राष्ट्रीय अध्यक्ष अमित आपटे यांच्याशी केलेली ही बातचित.**




Ashish.Chaudhari
@timesgroup.com
Tweet : @ashishcMT


**■ बदलत्या अर्थव्यवस्थेनुसार तज्ज्ञांची गरज किती?**

- कॉस्ट अकाउंटंट्सची संख्या आजपर्यंत ७५ हजार एवढी आहे. यापैकी स्वतःचा व्यवसाय करणाऱ्यांची संख्या साडेतीन ते चार हजार होती. दोन वर्षांत ही संख्या पाच हजारांपेक्षा जास्त झाली आहे. याचे प्रमुख कारण आहे 'जीएसटी'. परंतु, हेच एक कारण नाही. यासह 'कंपनी अॅक्ट २०१३' यामध्ये कॉस्ट अकाउंटंट्सला 'इंटरनल ऑडिटर' म्हणून काम करण्याची मुभा मिळाली. त्याचप्रमाणे 'इनसॉल्वेंसी अँड बँकरप्सी कोड २०१६' आलेल्या नवीन कायद्यामुळे ही व्यावसायिकता स्वीकारण्याकडे कल वाढला. भारतीय अर्थव्यवस्थेच्या विस्ताराचा विचार

मटा टॉकटाइम

करता आजघडीला अजून एक ते दीड लाख तज्ज्ञांची गरज आहे. 'कॉस्ट अकाउंटंट्स', 'सीए' अन् 'सीएस' या तीन्ही प्रकारातील दरवर्षी बाहेर पडणाऱ्या प्रोफेशनल्सची संख्या तीस हजार आहे.

**■ आपल्या कार्यकालत आपण काय बदल करताय?**

- मी दोन महिन्यांपूर्वीच पदभार स्वीकारला. त्यानंतर दोन महत्त्वाचे निर्णय घेतले. आमच्या विद्यार्थ्यांची एक मागणी होती की, दोन पेपरमध्ये त्यांना एक दिवसाची सुटी असायची. आमच्याकडे दोन पेपर एका दिवसात असायचे. त्यात काही मागील वर्षांपासून एका दिवसात एक पेपर केला होता. त्यात आता येत्या डिसेंबरच्या परीक्षेपासून दोन पेपरमध्ये एक दिवसाचा गॅप असेल. विद्यार्थ्यांना अभ्यास करण्याच्या दृष्टीकोनातून ते सोयीचे असले. दुसरा निर्णय म्हणजे जे कॉस्ट अकाउंटंट्स म्हणून स्वतःचा व्यवसाय करणारे आहेत त्यांना १५ दिवसांचे प्रात्यक्षिक आधारित प्रशिक्षण बंधणकारक केले आहे.

**■ अभ्यासक्रमात बदल कसे केले जातात?**

- आम्ही दोन स्तरांमध्ये अभ्यासक्रमात बदल करत असतो. ज्या कायदेशीर तरतुदी बदलतात त्यानुसार आम्ही तात्काळ अभ्यासक्रमात बदल करतो. दुसरा स्तर असा असतो की, दरचार-पाच वर्षांला अभ्यासक्रम पूर्णपणे बदलतो. अनेक जागतिक स्तरावरील संस्थांसोबत करार आहेत. यामध्ये जागतिक स्तरावरील कॉस्ट अँड मॅनेजमेंट अकाउंटंट्समधील 'यूके'मधील 'सीमा' नावाच्या संस्थेशी सामंजस्य करार आहे. आपण जागतिक स्तरावर दुसऱ्या क्रमांकावर असून ती संस्था पहिल्या स्थानावर आहे. आपले जसे १६ पेपर आहेत तसे त्यांचेही १६ पेपर आहेत. आपल्या कॉस्ट अकाउंटंट्ला 'सीमा यूके'ची पदवी हवी असेल, तर त्याला दोन पेपर द्यावे लागतात. त्यांचा अभ्यासक्रम आपला अभ्यासक्रमातही समानता आणण्याचा प्रयत्न केला जातो. कायद्यातील बदल लक्षात घेत दर सहा महिन्याला आपण आढावा घेत बदल करतोच.

**■ इन्स्टिट्यूटचे कोणत्या प्रकल्पावर काम सुरू?**

- इन्स्टिट्यूटने देशपातळीवर कृषी आणि वैद्यकीय सेवेशी निगडीत दोन महत्त्वाचे प्रकल्प हाती घेतले आहेत. वैज्ञानिकदृष्ट्या कृषी उत्पादनांनाची किंमत कशी काढायची यावर इन्स्टिट्यूट काम करत आहे. उत्पादनाची जी किंमत आहे त्यावर सरकार दीडपट हमीभाव देत आहे. हमीभावावर वाद असू नये यासाठी वैज्ञानिकदृष्ट्या नेमकी किंमत कशी राहील, हे मांडणार आहोत. यासह वैद्यकीय सेवेतील दहा जीवनावश्यक सेवांच्या किंमतीबाबतचा सविस्तर अहवाल सरकारला देणार आहोत. सरकारने गुडघा प्रत्यारोपण आणि हृदयरोग उपचारातील स्टेंट यांच्या किमती कमी केल्या. सरकारने निर्धारित केलेली किंमत आणि डॉक्टरांकडून आकारल्या जाणाऱ्या किमतीत मोठी तफावत होती. ही तफावत केवळ या दोन उपचारातच नसून, इतर वैद्यकीय सेवांची प्रत्यक्ष किंमत आणि डॉक्टरांकडून आकारली जाणीर किंमत यात मोठी तफावत आहे. कृषीचा अहवाल डिसेंबर तर मार्चपर्यंत वैद्यकीय सेवांबाबतचा अहवाल दिला जाईल.

**■ 'मॅनेजमेंट' हा शब्द लागावा यासाठी पाठपुरावा कसा?**

- भारतामध्ये कॉस्ट अकाउंटंट्स यांना 'कॉस्ट अँड मॅनेजमेंट अकाउंटंट्स' म्हणावे अशी आमची अनेक वर्षांपासून सरकार दरबारी मागणी आहे. जागतिक स्तरावर पाकिस्तान, बांगलादेश सारख्या देशांमध्ये अशा प्रकारचा उल्लेख होतो. यासाठी पाठपुरावा सुरू असून सरकारकडून तसे आश्वासनही दिले आहे. या बदलामुळे आंतरराष्ट्रीय स्तरावरही बळ मिळेल, 'आयसीएआय'बाबतचा संभ्रमही दूर होईल. पूर्वीपर्यंत तर कॉस्ट अँड वर्क अकाउंटंट्स म्हणायचे आता कॉस्ट अकाउंटंट्स म्हणतात.

# लक्ष्य के पीछे लगने से वैयक्तिक व व्यावसायिक उन्नति

## आईसीएआई परीक्षा के मेधावी छात्रों के सम्मान में राष्ट्रीय अध्यक्ष आपटे ने कहा

**शहर संवाददाता** | औरंगाबाद




दि इन्स्टीट्यूट ऑफ कॉस्ट अकाउंट्स ऑफ इंडिया (कोलकाता) की ओर से दिसंबर 2017 और जून 2018 में आयोजित फाउंडेशन, इंटरमीडिएट और फाइनल परीक्षा के मेधावी छात्रों का सत्कार समारोह रेलवे स्टेशन रोड स्थित द इन्स्टीट्यूशन ऑफ इंजीनियर्स के हॉल में उत्साहपूर्ण माहौल में संपन्न हुआ। इसमें इन्स्टीट्यूट ऑफ कॉस्ट अकाउंट्स ऑफ इंडिया-कोलकाता के राष्ट्रीय अध्यक्ष सीएमए अमित आपटे ने कहा कि छात्रों को लगन से अपने लक्ष्य का पीछा करने पर वैयक्तिक और व्यावसायिक उन्नति का रास्ता मार्ग खुला होकर जीवन में सफलता मिलती है।

इस अवसर पर वस्तु एवं सेवा कर के संयुक्त आयुक्त अशोक कुमार, सीएमए सूचित नायडू- मुख्य वित्तीय अधिकारी (सीएफओ)-हिंडाल्को-अल्मेक्स एयरोस्पेस लिमिटेड, अध्यक्ष, डब्लूआईआरसी ऑफ कॉस्ट अकाउंट्स ऑफ इंडिया, अध्यक्ष मुंबई, सीएमए एल.डी. पवार, सीएमए हर्षद देशपांडे, कोषाध्यक्ष -डब्ल्यूआईआरसी इन्स्टीट्यूट ऑफ कॉस्ट अकाउंट्स ऑफ इंडिया (मुंबई), सीएमए नीरज जोशी, प्रादेशिक परिषद सदस्य आदि प्रमुख रूप से उपस्थित थे। कार्यक्रम में चैप्टर की ओर से आयोजित किए जाने वाले विभिन्न उपक्रमों की जानकारी अध्यक्ष सीएमए एम आर पंडित ने दी। प्रशिक्षण समिति की ओर से छात्रों के लिए चलाए जाने वाले उपक्रमों की और आगामी चुनौतियों की जानकारी प्रशिक्षण समिति के अध्यक्ष सीएमए पराग राणे ने दी। आपटे ने पिछले 30 वर्षों से मराठवाड़ा के ग्रामीण क्षेत्र के छात्रों को उत्तम मार्गदर्शन और प्रशिक्षण देने का काम करने पर औरंगाबाद शाखा की भूरि-भूरि प्रशंसा भी की। इस अवसर पर संस्था के औरंगाबाद शाखा के सीएमए बिशेश्वर सेन, सीएमए राजेश देशमुख, सीएमए शैलेंद्र सिंह राजपूत आदि सदस्य और अनिल कुलकर्णी, सीएस सागर देव, सीएमए संवेदी राणे, सीएमए अनंत दरगड कॉलेज के प्राध्यापक राजेश लहाने, प्राध्यापक रूपेश रेब्बा विशेष रूप से उपस्थित थे। कार्यक्रम में सीएमए फायनल कोर्स में सफलता अर्जित करने वाले छात्र कोमल मुथा, दीपक नाईक, चैतन्य कंवर, गणेश ताठे, अमूल्य विश्वांद्रा, विशाल नाईक, खालेद अन्सारी, अजिंक्य महाजन, अमोल लहाने, नितिन कपूर, राहुल गरड, रंजीत नंदूरे, समृद्धि स्वरो, संतोष थाबड़े, श्रेयस खोंडे, धनंजय भांबुरले, सागर बाहेती का सत्कार किया गया।




**दि इन्स्टिट्यूट ऑफ कॉस्ट अकाऊंटंटस् ऑफ इंडियाच्या वतीने घेण्यात आलेल्या फाऊंडेशन इंटरमिजिएट आणि फायनल परीक्षेतील गुणवंतांच्या कौतुक सोहळ्यात बोलताना राष्ट्रीय अध्यक्ष सीएमए अमित आपटे, हिंदाल्कोचे सीएफओ सीएमए सुचित नायडू, मुंबई चॅप्टरचे अध्यक्ष सीएमए एल.डी. पवार, संभाजीनगर शाखेचे अध्यक्ष एम. आर. पंडित, सचिव सीएमए किरण कुलकर्णी आणि प्रशिक्षण समितीचे अध्यक्ष सीएमए पराग राणे.**

# 'सीएमए'च्या वतीने 'आयसीआय' परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

संभाजीनगर, दि. २ (प्रतिनिधी) - 'दि इन्स्टिट्यूट ऑफ कॉस्ट अकाऊंटटस् ऑफ इंडियाच्या (सीएमए) वतीने डिसेंबर २०१७ आणि जून २०१८ मध्ये घेण्यात आलेल्या फाऊंडेशन, इंटरमिजिएट आणि फायनल परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा सोमवारी रेल्वे स्टेशन रोडवर असलेल्या भानुदास चव्हाण सभागृहात पार पडला.

या प्रसंगी 'आयसीआय'चे राष्ट्रीय अध्यक्ष अमित आपटे, वस्तू आणि सेवा कर विभागाचे संयुक्त आयुक्त अशोककुमार, सीएमए सूचित नायडू, सीएमए एल.डी. पवार, सीएमए हर्षद देशपांडे, सीएमए नीरज जोशी आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती.

**संभाजीनगर शाखेत विद्यार्थ्यांना उत्तम मार्गदर्शन आणि प्रशिक्षण**

यांप्रसंगी संभाजीनगर चॅप्टरतर्फे राबविण्यात येत असलेल्या विविध उपक्रमांची माहिती चॅप्टरचे अध्यक्ष सीएमए एम. आर. पंडित यांनी दिली. प्रशिक्षण समितीच्या वतीने विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात येणाऱ्या उपक्रमाची आणि आगामी आव्हानांची माहिती प्रशिक्षण समितीचे अध्यक्ष सीएमए पराग राणे यांनी दिली.

यांप्रसंगी बोलताना अध्यक्ष अमित आपटे म्हणाले, विद्यार्थ्यांनी एकाग्र चित्ताने ध्येयाचा पाठपुरावा केल्यास वैयक्तिक आणि व्यावसायिक उन्नतीचा मार्ग सुकर होऊन जीवनात यशस्वी होता येईल. व्यवसायात काम करताना प्रामाणिकपणे काम करणे गरजेचे आहे. त्यामुळे आपल्याला यशाच्या शिखरावर जाता येणार आहे आणि समाजातही लौकिक वाढणार आहे. इंग्रजी भाषा अवगत करा, पण मराठीलाही दूर करू नका, व्यवसाय करताना समाजाशी संवाद साधणेही गरजेचे असल्याचे ते म्हणाले. मागील ३० वर्षांपासून अविरतपणे मराठवाड्यातील ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना उत्तम मार्गदर्शन आणि प्रशिक्षण देण्याचे कार्य केल्याबद्दल त्यांनी संभाजीनगर शाखेचे कौतुक केले. प्रमुख पाहुणे अशोककुमार यांनी, संस्थेच्या राष्ट्रनिर्मितीच्या कार्यातील योगदानाविषयी गौरवोद्गार काढले. सीएमए सूचित नायडू मार्गदर्शन केले.

संभाजीनगर चॅप्टरचे अध्यक्ष सीएमए एम. आर. पंडित , सचिव सीएमए किरण कुलकर्णी, प्रशिक्षण समितीचे अध्यक्ष सीएमए पराग राणे, खजिनदार सीएमए प्रकाश ससेमहाल , कार्यकारिणी सदस्य सीएमए सुरेश पिंपळे आणि सीएमए सुरेश भंगाळे यांनी प्रमुख पाहुण्यांचे स्वागत केले. परिचय सचिव सीएमए किरण कुलकर्णी आणि सीएमए अक्षय दंडे यांनी केले. सूत्रसंचालन सीएमए अक्षय दंडे यांनी तर सीएमए किरण कुलकर्णी यांनी आभार मानले. यांप्रसंगी शाखेचे सीएमए विशेश्वर सेन, सीएमए राजेश देशमुख, सीएमए शैलेंद्रसिंग राजपूत यांच्यासह बहुसंख्य सभासद आणि अनिल कुलकर्णी, सीएस सागर देव, सीएमए संवेदी राणे, सीएमए अनंत दरगड हे शिक्षकवृंद, कॉलेजचे प्राध्यापक राजेश लहाने, प्राध्यापक रूपेश रेब्बा यांची विशेष उपस्थिती होती.

# ‘आयसीएआय’ गुणवंतांचा सत्कार

## फाउंडेशन, इंटरमीजिएट, फायनल परीक्षेतील उत्तीर्णांचा गौरव

औरंगाबाद, ता. २ : द इन्स्टिट्यूट ऑफ कॉस्ट अकाउंटंट्स ऑफ इंडिया (कोलकाता) यांच्या वतीने डिसेंबर २०१७ आणि जून २०१८ मध्ये घेण्यात आलेल्या फाउंडेशन, इंटरमीजिएट आणि फायनल परीक्षेतील उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा सोमवारी (ता. एक) सत्कार झाला.

रेल्वे स्टेशन रोडवरील 'द इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनिअर्सच्या हॉलमध्ये सायंकाळी सहा वाजता हा कार्यक्रम घेण्यात आला. आयसीएआयचे राष्ट्रीय अध्यक्ष सीएमए अमित आपटे, सीजीएसटीचे संयुक्त आयुक्त अशोक कुमार, सीएमए सूचित नायडू, सीएमए एल. डी. पवार, सीएमए हर्षद देशपांडे, सीएमए नीरज जोशी यांच्या हस्ते गुणवंतांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमात सीएमए एम. आर. पंडित, सीएमए पराग राणे यांनी वर्षभर राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांची माहिती दिली. अमित आपटे आणि अशोक कुमार, लक्ष्मण पवार यांनी मार्गदर्शन केले.




**औरंगाबाद : सत्कार सोहळ्याप्रसंगी मार्गदर्शन करताना सीजीएसटीचे संयुक्त आयुक्त अशोक कुमार यांच्यासह मान्यवर.**

यावेळी प्रकाश ससेमहाल, सुरेश पिंपळे, सुरेश भंगाळे, अक्षय दंडे, राजेश देशमुख, शैलेंद्रसिंग राजपूत, अनिल कुलकर्णी, सागर देव, संवेदी राणे, अनंत दरगड, राजेश लहाने, रूपेश रेब्बा उपस्थित होते. कार्यक्रमात कोमल मुथा, दीपक नाईक, चैतन्य कंवर, गणेश ताठे, अमूल्य विश्वांधा, विशाल नाईक, खालेद अन्सारी, अजिंक्य महाजन, अमोल लहाने, नितीन कपूर, राहुल गरड, रणजित नंदुरे, समृद्धी स्वरे, संतोष साबडे, श्रेयस खोंडे, धनंजय भांबुर्ले, सागर बाहेती यांचा सत्कार करण्यात आला. सूत्रसंचालन मधुरा दीक्षित यांनी केले, तर किरण कुलकर्णी यांनी आभार मानले.